म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २६२७

# मी धात्री, मी धरित्री

## लक्ष्मीकांत तांबोळी



REFBK-0026347
REFBK-0026347

संदर्भ
काव्य
२६२१
२६३४८
१५।३।९१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६२१
ग्रं. क्र. २६३४८
काव्य १५।३।९१
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# मी धात्री, मी धरित्री

( कवितासंग्रह )

REFBK-0026347

REFBK-0026347

लक्ष्मीकांत तांबोळी

प्रतिमा प्रकाशन

**प्रकाशन क्रमांक : ६८**

**प्रकाशक :**

अरुण वि. पारगावकर

प्रतिमा प्रकाशन, १३५९ सदाशिव पेठ, पुणे-३०

( फोन - ४३७ ४४४)

**मुद्रक :**

अमोल कारखानीस

ग्राफीक इंप्रेशन

७१४ डेक्कन जिमखाना

पुणे - ४११००४

**लेझर सेटिंग :**

अल्फाबेट टाईपसेटर्स

९/६ साने गुरूजी रोड

निलायम टॉकीज जवळ, अशोका हॉटेलच्यामागे

पुणे - ४११०३०

© **सौ. मालती तांबोळी**

**पहिली आवृत्ती :** २६ जानेवारी १९९१

**मुखपृष्ठ :** अभय पुरंदरे

**मूल्य :** २५ रुपये

---

या कवितासंग्रहाच्या प्रकाशनासाठी मराठवाडा विद्यापीठाकडून अनुदान मिळालेले आहे. त्याबद्दल मन:पूर्वक आभार.

माझ्या कवितेच्या पहिल्या हुंकाराचा

साक्षी

अरविंद थिटे तथा रवींद्र बोरगावकर

यास

अनुक्रम :


१. इमान/६
२. कितीतरी दिवसानंतर/७
३. जगता जगता/८
४. पणतू/९
५. भाग्यवान/१०
६. रस्ते/११
७. जे गेले ते गेले/१२
८. बीजवृक्ष/१३
९. शत्रू/१४
१०. परमेश्वर/१५
११. हे तुला ठाऊक होते/१६
१२. मी : कुणीतरी/१८
१३. मारेकऱ्यांनो/१९
१४. तो हात कुठे गेला?/२०
१५. जलप्रलय : रामदासी धाटी/२१
१६. कविता/२२
१७. एकदा एकदा/२३
१८. ससंदर्भ/२४
१९. एकदा मी/२५
२०. जन्मन: जायते शूद्रः/२६
२१. पंचनामा/२७
२२. इमानदार/२८
२३. दुःख/२९
२४. गल्ल्याबोळातून/३०
२५. कावळे/३१
२६. बैराग्यांनो/३२
२७. ही वाट अशी/३४
२८. पक्षी/३५
२९. नातं/३६
३०. कुणाकुणासाठी ?/३७
३१. हाका/३८
३२. जा म्हणावे पाखरांना/३९
३३. विपरीत/४०
३४. घर/४१
३५. माझी आई/४२
३६. परमेश्वरा/४३
३७. कविता/४४
३८. ते पाखरू/४५
३९. जी. ए./४६
४०. उसणे दुःख/४७
४१. आडोसा/४८
४२. भाकर/४९
४३. वस्त्र/५०
४४. वाट/५१
४५. म्हणून काय ?/५२
४६. मी धात्री, मी धरित्री/५३
४७. शहर–ए–औरंगाबाद/५५
४८. निबिड अरण्य हे/५८
४९. स्वामी/५९
५०. काय झाले ?/६०
५१. माझे आकाश/६१
५२. चौकोनी आकाश/६२
५३. निरोप –१/६३
५४. निरोप –२/६४
५५. ही रात्र/६५
५६. –तर/६६
५७. नुसतंच.../६७
५८. औरसांनो/६८
५९. ती/६९
६०. कधीतरी/७०
६१. त्यांचे वाजले नगारे/७१
६२. भाग्य/७२
६३. दार/७३
६४. वैर/७४
६५. शीर्षक/७५
६६. तहान/७६
६७. ?/७७
६८. पुरे असतो/७८
६९. मला दिसतो आहे/७९
७०. कवितेची सांगता/८०

संग्रहालय ठाणे

जन्मासोबत श्वास आला
श्वासासोबत कविता,
मृत्यूनंतर श्वास जाईल
कुठे जाईल कविता ?



## इमान

आजवर राखले इमान शब्दांशी
तर माणसे बैमान झाली,
आता राखतो आहे इमान माणसांशी
तर शब्द बैमान झाले !



# कितीतरी दिवसानंतर

कितीतरी दिवसानंतर
सुटते आहे मौन माझ्या कवितेचे
मरणासन्न माणसाने घ्यावेत शेवटचे आचके
तशा ह्या ओळी...

कवितेनेही भ्यावे मरणाला
केवढे हे दुर्दैव !
आणि या मरणवेळी कविताच यावी ओठावर
केवढे हे सुदैव.

ग्रंथालय ठाणे
३६२९
३६३४८
काव्य ७५१/३१९



# जगता जगता

येताना आपले असे-
श्वासाशिवाय काय असते ?
जाताना आपले असे-
श्वासाशिवाय काय जाते ?

तसे आपले काही नसते
म्हटले तर सगळे असते,
जिथे पडेल अपुले पाउल
तीच आपली वाट असते !

कधी कधी आयुष्य देखील
केवळ उरते श्वासापुरते,
तरी आपण जगत असतो
इथे तिथे जोडीत नाते !

जगता जगता ओठावरती
सहज कधी गाणे येते
माथ्यावरचे उन्ह तेव्हा-
पायाखालची सावली होते !



# पणतू

माझ्या जराजर्जर आईला पणतू झाला
तिनं पणतवाला पाहिलं डोळाभर
आणि तिचा चेहराच चांदवा झाला !
पणतवाला पाहताना अपूर्व पाहिल्यागत ती हरखली
गालावरील सुरकुत्यांच्या रेषा ओलांडीत -
तिचा कोंडलेला आनंद अश्रू होउुन
टपकन् बाळाच्या मस्तकावर पडला,
अनावर उमाळ्यानं तिनं त्याला मांडीवर घेतलं
तिचा अवघा देहच पाळणा होउुन झुलू लागला
आणि तिच्या काळजातील अभंग जाउुन
अंगाईला कोंभ फुटला !
माझ्या आईला पणतू झाला.



## भाग्यवान

ते भाग्यवान
ज्यांना अजूनही स्वप्ने पडतात !

ते पुण्यवान
ज्यांना अजूनही नित्य नवी पापे खुणावतात

ते कलंदर
असतात दारे उघडी ज्यांच्या घरांची

ते सिकंदर
ज्यांना अजूनही आमंत्रणे युद्धाची !



# रस्ते

पाय थकले तरी रस्ते थकत नसतात
वळण आले की रस्ते आपले निमुट वळतात
रस्त्यांना ठाउुक असतात सारेच खाच-ख्ळगे - साऱ्याच खाणाखुणा.
चालत्याच्या चालीवरूनच ओळखतात रस्ते, कोण नवा, कोण जुना !
रस्त्यांना ठाउुक असतात वळणे आणि आडवळणे
कोपरान् कोपरा, भिंत न् भिंत ओलांडून पुढे जाणे !
रस्ते असतात म्हणून तर घरे जागेवर राहतात
रस्ते संपले की घरेही मुळापासून हादरतात !
रस्तेच नसतील तर जातील घरे कुणीकडे ?
रस्ताच नसेल तर छप्पर असूनही घरच उघडे.

रस्ते संपत नाहीत, ते फक्त रस्त्याला मिळतात
रस्ते असतात म्हणूनच वस्त्या वाढतात !



## भाग्यवान

ते भाग्यवान
ज्यांना अजूनही स्वप्ने पडतात !

ते पुण्यवान
ज्यांना अजूनही नित्य नवी पापे खुणावतात

ते कलंदर
असतात दारे उघडी ज्यांच्या घरांची

ते सिकंदर
ज्यांना अजूनही आमंत्रणे युद्धाची !



# रस्ते

पाय थकले तरी रस्ते थकत नसतात
वळण आले की रस्ते आपले निमुट वळतात
रस्त्यांना ठाउक असतात सारेच खाच-खळगे - साऱ्याच खाणाखुणा.
चालत्याच्या चालीवरूनच ओळखतात रस्ते, कोण नवा, कोण जुना !
रस्त्यांना ठाउक असतात वळणे आणि आडवळणे
कोपरान् कोपरा, भिंत न् भिंत ओलांडून पुढे जाणे !
रस्ते असतात म्हणून तर घरे जागेवर राहतात
रस्ते संपले की घरेही मुळापासून हादरतात !
रस्तेच नसतील तर जातील घरे कुणीकडे ?
रस्ताच नसेल तर छप्पर असूनही घरच उघडे.

रस्ते संपत नाहीत, ते फक्त रस्त्याला मिळतात
रस्ते असतात म्हणूनच वस्त्या वाढतात !



# जे गेले ते गेले

जे गेले ते गेले, ठेवून मागे निरर्थ जयघोष
लोळ उठे ज्वाळांचा, ऐसा कैसा भयांध जल्लोष ?

वाटांनाही इथल्या, ठाऊक आहे कुठे कसे जावे
यावे ज्याने त्याने, आणिक अपुले बिऱ्हाड लावावे

शोधित बसतो कोणी, दिंडी अपुली कुठे कशी गेली,
टाळ मृदंग नि वीणा, खांदी काठी तशीच धरलेली.
दूर फडावर तेथे कीर्तन रंगे कुण्या महंताचे
गजर सुरू टाळ्यांचा आणिक भवती जमाव भगतांचे !



## बीजवृक्ष

आईच्या मायेसारखी
मातीची घट्ट मिठी असते
म्हणून तर झाडांना
वाऱ्या-वादळाची भीती नसते.
झाडांनी कधीच करू नये गर्व
आपल्या पर्णसंभाराचा,
मिरवू नये दिमाख ऋतुवार बहरांचा
झाडांनी धरूही नये भरवसा आभाळाचा.
पाखरं आभाळात उडतात
पण घरटी मात्र झाडावरच बांधतात
झाडांनी हे विसरू नये.
झाडांनी फक्त वाढत राहावे
पाखरांच्या घरट्यासाठी
- आणि अवघे झाडपण तोलणाऱ्या
मातीशी इमान राखीत
ज्या कुशीतून जन्म झाला
ती वांझ राहणार नाही
यासाठी बीज होउुन उरावे
बीजवृक्ष व्हावे !



# शत्रू

शत्रू कोण हे कळले
तर सावध राहता येते
शत्रू बाहेरचा असेल
तर आव्हान स्वीकारता येते
मग दोन देताही येतात
दोन घेताही येतात.
शत्रू घरातलाच असेल
तर हाकलता येतो
फार तर आपल्याला -
घरही सोडता येते
पण आपणच आपले शत्रू झालो
तर काय करावे ?
ठेवताही येत नाही त्याला
ठेचताही येत नाही त्याला !



## परमेश्वर

परमेश्वराची कृपा हे तसं काही
खरं नाही,
परमेश्वर म्हणजे आपणच आपल्या
दुबळेपणाला दिलेलं एक नाव !
आपण त्याची प्रार्थना करावी ही
त्याचीही इच्छा असते,
आपली श्रद्धा हेच त्याचे संरक्षक कवच असते !
हे कवच आपण फोडले की परमेश्वरही
केविलवाणा होऊन
आपलीच करुणा भाकू लागतो !
स्वत:च्या अस्तित्वासाठी त्यालाही
आपलाच आशीर्वाद हवा असतो !



# हे तुला ठाउुक होते

आयुष्याच्या वैराण वाळवंटातून तुझ्या
किती काफिले वाजत गाजत गेले
तू पाहतच राहिलास नुसता
न मोजता पाऊलखुणा
द्यायचा असतो आधार पावलांनाच जमिनीने
हे तुला ठाऊक होते.
तू एक गतिमंत प्रवासी
किनारे न शोधणारा...
वाहत गेले तुझे आयुष्य पाण्यासारखे
पाण्याने नुसते वाहायचे असते
मोजायचे नसते अंतर
हे तुला ठाऊक होते.
तसा तू सदैव पेटलेला अंतर्यामी
आयुष्यच तुझे धगधगते यज्ञकुंड
अस्मितेला शापच अखंड जळत राहण्याचा
हे तुला ठाऊक होते.
तसा तू बेबंद बेलगाम वाऱ्यासारखा
अवघे बेभानपण साठवून उरात
तू झोकून दिलेस स्वत:लाही वाऱ्यावर
वाऱ्याने कधीच बांधायचे नसते घर
हे तुला ठाऊक होते !



मनातले दान हातातल्या कवड्यांनी द्यावे
हे भाग्य कधीच न लाभलेल्या महंता
तू होतास आकाशासारखा निर्लेप, निरासक्त
आकाशाने कधीच यायचे नसते जमिनीवर
हे तुला ठाऊक होते !



## मी : कुणीतरी

मी : कुणीतरी
सहस्रशीर्षातील केवळ एक शीर्ष,
सहस्रपादातील दोन पाय;
घेऊन निघालो आहे -
अशा प्रवासाला,
जिथे कुणी कधी पोहचला नाही.
सहस्राक्षातून लाभलेले दोन डोळे,
जपतात पाऊलखुणा अशांच्या -
ज्यांचा वाटचालीतच अंत झाला !
कड्याकड्यावर उभे आहेत,
त्यांच्या प्रेतयत्नांचे सांगाडे,
वाटाडे होऊन वारंवार तोच तो रस्ता दाखविणारे.
या ठिकाणी प्रत्येकजण आपली वाट चुकला आहे -
मीही निघालो आहे त्याच वाटेने.



# मारेकऱ्यांनो

इथे तर अगोदरच पेरून ठेवले आहेत
सुरूंग जागोजाग
वाट पाहताहेत बत्ती लावणाऱ्यांची !
पटाईत आहेत इथले सारे भालाईत
कसे ठोकावे खिळे, कसे चढवावे फासावर
हे त्यांना पुरते ठाउुक आहे !
मारेकऱ्यांनो,
तुमचा ख्रिस्तशोध कधी संपणार आहे ?
दर पिढीला ख्रिस्त जन्मतो -
हा तुमचा भ्रम आहे
अरे, इथे लावले जाते नख जन्मण्यापूर्वीच
प्रत्येक ख्रिस्ताला !



## तो हात कुठे गेला ?

पृथ्वीचे तुकडे करून
ज्याने त्याने घेउुन टाकले
पाण्याचेही तुकडे करून
ज्याने त्याने वाटून घेतले
प्रकाश तर आधीच त्यांनी
तारांमधून खेळवत ठेवला
इवल्याशा बटनामध्ये -
कायम डांबून ठेवला !
वाऱ्यालाही तसे त्यांनी
असे काही झुलवत ठेवले
हवे तेव्हा, हवे तसे
इकडे तिकडे फिरवत नेले.
आकाशही त्यांनी तसे
आधीच आपल्या मुठीत आणले
अवकाशात उड्डाण करून
ग्रहगोल जिंकून घेतले !
तुकडे करायला काहीच नाही
म्हणून स्वत:वर घाव केला,
-आणि आता शोधू लागलेत
तो हात कुठे गेला ?



## जलप्रलय : रामदासी धाटी

जळाचा प्रळ्यो ऐसा, जळे उच्छाद मांडिला
उदंड जाहले पाणी, प्राण त्राण हरावया.
धो धो वर्षती धारा, गडगडा गगन गडगडे
कडकडा मोडती झाडे, कडाडा वीज कडकडे
सों सों सों सूटे वारा, बो बो बो बोंब मारती
खळाळा लोट पाण्याचे, धा धा धा सर्व धावती.
पर्जन्य कोपला ऐसा, जिवाचा नाही भरवसा
धिर्धरा, धिर्धरा ऐशी, उगा हे बोंब मारती
जळाने गिळिली गावे, वरूनी धान्य वाटती
विमाने घर्घरा फिरती, उगा हे बोंब मारती
वाढता वाढता वाढे, व्यापिले पृथ्वीमंडळा
अनर्थ देखिला डोळां, शोकास तुळणा नसे
जळाचा प्रळयो ऐसा, वर्णाया शब्द बाबडे
रामदासी नेटकी धाटी, तयासी तूळणा नसे !



# कविता

शुद्धिपत्रासाठी 'ज्ञाना' गावोगाव हिंडून आला
तेव्हा कुठे त्याचा बोल अमृताला जिंकून गेला
दळून दळून जनाईच्या हातालाही घट्टे पडले
तेव्हा कुठे जात्यामधून पीठ गाणे होऊन आले
स्वतःच स्वतःला तुकोबाने खूप छळले
पाठीवरचे वळच त्याच्या, ओळ होऊन बाहेर आले.
जीवाच्या आकांताने 'नारायणा' पळत सुटला
मनाचाच शोक त्याच्या, श्लोक होऊन प्रगट झाला !
- म्हणून नुसत्या कविता करणे हे काही खरे नाही
जगणे खरे केल्याशिवाय कविता लिहिणे बरे नाही.



## एकदा एकदा

चार भिंतीच्या खुराड्यात
चार स्वप्नांची रचून उतरंड
जगणाऱ्या -
आता तरी जागा हो !
टिचभर जगण्याला
आभाळभर ठिगळ लावणाऱ्या
आता तरी सावध हो !
नको बसूस गोंजारत मुर्दाड मनाला
गात तीच ती शिळी अंगाई !
आग आग पेटली आहे तुझ्याभोवती
कशी येत नाही जाग तुला !
जमत नसेल तर भीक माग
लंगोटीचा आहेर सहज कुणी करून जाईल
फक्त एकदा, एकदा तू नागवा हो !



## ससंदर्भ

प्रत्येक वर्ष
ही एक ओळ धरली
तर शंभर ओळींची एक दीर्घ कविता
लिहिली असे होईल.
कुणाच्या तरी लक्षात येईल की संदर्भासाठी
तळटीपाच दिलेल्या नाहीत.
नुसताच तपशील भरलाय
म्हणून शंभर वर्षे म्हणजे एक जिंदगी
अशी टीप देऊन ठेवतोय !



## एकदा मी

एकदा मी स्मशानास भेट दिली तर -
प्रेतांनीच अडवून मला विचारले,
''दाखव तुझा पास ?''
एवढ्यावरच थांबले नाहीत तर -
ते आणखी म्हणाले -
''चौघांच्या खांद्यावर यायचे तर
एकटाच कसा आलास ?''

- तेव्हापासून मी अजूनही स्मशानात गेलो नाही

ग्रंथ संग्रहालय ठाणे



## जन्मनः जायते शूद्रः

जन्माने तर शूद्र होतो
संस्काराने ब्राह्मण केले
आचमने करता करता
वयच नुसते वाढत गेले
हात-पाय धुतल्याशिवाय
ताटावरती बसू नये,
अपोषण घेतल्याशिवाय
तोंडात घास घालू नये
'मम' म्हणताच हात लावावा
'का ?' म्हणून विचारू नये
अशी मारली ब्रह्मगाठ
जन्मभर सुटू नये !
गायित्रीच्या मंत्रासह
जानवे जेव्हा गळ्यात आले
आयुष्यच खुंटीवरचे
एक कुबट सोवळे झाले !



## पंचनामा

वर्तमानपत्रात बातमी-
''एका अज्ञात इसमाचा मृत्यु''
नंतर पंचनामा सुरू-
का मेला? कसा मेला ?कशाने मेला?
मेला की मारले ? कोणी मारले ? का मारले ?
कशाने मारले ? नाव काय ? गाव काय ?
एकजण पुढे आला नि म्हणाला-
''मी ओळखतो याला''
''काय करायचा ?'' या प्रश्नावर उत्तरला-
''दिवसा चांदण्या मोजायचा
रात्री सूर्य शोधायचा
उरलेल्या मधल्या वेळात
आकाश पांघरून झोपी जायचा''
पंचनामा पूर्ण झाला.
नंतर पोस्टमार्टेम-
चिरफाड, डॉक्टराचे सर्टिफिकेट
नो पॉयझनिंग, नो ॲक्सिडेंट
नो स्युसाईड, नॅचरल डेथ.
नंतर धर्माप्रमाणे जाळायला किंवा पुरायला
परवानगी
स्मशानात रवानगी !
वर्तमानपत्रात पुन्हा बातमी-
''एका अज्ञात इसमाचे प्रेत सापडले
कायद्याप्रमाणे त्याची विल्हेवाट लावण्यात आली.''



## इमानदार

या डोळसांच्या दुनियेत
कुणीच दिसत नाही इमानदार
त्याहून आंधळे बरे -
त्यांचे चाचपडणे तरी खरे असते !

# दुःख

थेंबही न बरसता
शिरावरून नुसतेच ढग जावेत
असे हे दिवस !
मागे वळून पाहावे
तर काय दिसावे ?
आपलेच सांगाडे
पाठीशी उभे असलेले !
आपण जळूनही गेलो नाही पुरते
यापरते दुःख ते कोणते ?



# गल्ल्याबोळातून

गल्ल्याबोळातून आता नुसत्या घोषणाच घोषणा
ज्यान त्याने घेतलाय आवाज माइकचाच उसणा !
गाता गाताच लोक कसे ओरडायला लागले आता
गजबजलेल्या वस्त्या उजाड झाल्या बघता बघता.
वस्ती सोडून जंगलात गेलो तर तिथे वेगळीच दंगल माजलेली
सिंहाची सगळी आयाळच उंदरांनी कुरतडलेली !
जाऊन पाहिले देवळात तर तिथे देवाचाच लिलाव मांडलेला
वाजणाऱ्या घंटांचा आवाज, जागच्याजागी थिजलेला!

## कावळे

कावळ्यांनी ओरडू नये तर काय करावे ?
सूर्य उगवो अथवा मावळो
सकाळ-संध्याकाळ कावळे आपले -
ओरडतच राहणार.

एखाद्याच्या ललाटीच असतो
केवळ करणे कलकलाट
त्याला आपण काय करणार?
फार तर पिंड देऊन आपण त्यांना गप्प करणार

सूर्य आहे म्हणून ओरडायला तरी मिळते
हे त्यांना कधी कळणार ?



## बैराग्यांनो

बैराग्यांनो,
तुम्ही तुमच्या मठात परत जा
तिथे तुम्ही पेटवलेली 'धुनी' विझत आली आहे
तुमचा 'अलख' तुम्हालाच लखलाभ असो
आम्ही तर आधीच कफल्लक.
तुमची ती निरंजनी मात्रा आम्हाला -
लागू पडणार नाही, बैराग्यांनो त्रिवार नाही.

तुम्ही केवळ अंगावर राख फासलीत
आम्ही तर आमचे आत्मेच राख करून टाकलेत
लावता ना तीही थोडी अंगाला ?
चिताभस्मापेक्षा आत्म्याची राख फासणे
म्हणजे एकदम समाधीत जाणे
(जसे की तुमचे ब्रह्मानंदी विलीन होणे !)
बैराग्यांनो, सांगा किती भेगा तुमच्या पायांना ?
कुठल्या काट्याच्या ? कुठल्या वाटांच्या ?
किती कटोरे प्यालात पाणी तुम्ही गंगेचे ?
किती निवारे पाहिलेत तुम्ही ओवऱ्यांचे ?
किती बाबा ? किती भगवान ? किती माँई ? किती देवी ?
किती ला ना साँई, किती स्वर्गांची तुमची कमाई ?
किती घाटांवर वाळवल्यात तुम्ही जटा ?
किती देवळांच्या बडवल्यात तुम्ही घंटा ?



वाजवल्यात ना टाळ्या, टाळ आणि झांजा
का गंगेतच वाहून गेल्यात तुमच्या सगळ्या सांजा ?
एखादी तरी प्रार्थना होती का ?
घाटावर जळणाऱ्या प्रेतासाठी
वाजवलीत का कधी झांज ?
उपाशी सांजवेळेसाठी ?
बैराग्यांनो,
तुम्ही फक्त चिमट्यामधून अध्यात्म पकडीत गेला

पोटाला चिमटा घेऊन आम्ही मात्र उत्सव केला !
तरीही, कधीही उमटले नाहीत आमचे हुंदके
तुमच्या त्या शुभंकर शंखामधून
सांगून टाका ना की शंखालाही डोळे नसतात म्हणून.
साँई,
असा कसा तुमचा कटोरा रिकामा ?
भरता भरत नाही,
तुम्हाला भिक्षा वाढणारी माँई
असते ना खरोखर कुणाची तरी आई !



## ही वाट अशी -

ही वाट अशी-
दूर दूरवर नेते,
पण वळणावरती अडते!

हे झाड असे-
फुलाफुलांतून हसते,
पण मातीवरती रुसते !

हे दु:ख असे-
महापूरसे येते,
पण थेंबथेंबसे झरते !



## पक्षी

पक्षी येतात कुठून कुठून
पक्षी येतात दुरून दुरून

पक्षी येतात मिळून मिळून
पक्षी येतात फिरून फिरून

पक्षी येतात एकटे एकटे
काळजात बांधतात इवले घरटे

पक्षी येतात, उडून जातात
आपले डोळेच खुडून नेतात !



# नातं

झाडांचं पाखरांशी काय नातं ?
हे झाडांना तरी कुठं कळतं !
का येतात पाखरं ?
कुठून येतात पाखरं ?
पाखरांचं काय खरं !

पाखरं येतात, विसावतात
मनात आलं की उडून जातात
कधी नुसत्याच -
घिरट्या घालतात.
केव्हातरी फांदीवर घरटं दिसतं
तेव्हा झाडाला बरं वाटतं

झाडांचं पाखरांशी हे असं नातं
झाडांचं पाखरांशी एवढंच नातं !



# कुणाकुणासाठी ?

दरवर्षीच झडतात पाने
कुणाकुणासाठी रडावे झाडाने ?
दरवर्षीच येतात पाखरे
कुणाकुणासाठी झुरावे झाडाने ?



# हाका

आजवर हाका देत गेलो
लवलवत्या पानांना
उमलत्या फुलांना
उगवत्या ताऱ्यांना
तर त्यांनी ऐकून न ऐकल्यासारखे केले !

हाका देता देता
आता तर हाकच उमटेनाशी झाली आहे
आणि आश्चर्य, मलाच येताहेत हाका-
झडणाऱ्या पानांच्या
गळणाऱ्या फुलांच्या
तुटणाऱ्या ताऱ्यांच्या

पण क्षमा करा,
पानांनो, फुलांनो, आणि ताऱ्यांनो
'ओऽ' देण्याइतपत त्राणही आता उरले नाही
हाका ऐकू येत नाहीत असे मात्र नाही.



## जा म्हणावे पाखरांना

जा म्हणावे पाखरांना
उडून दूर... कुठेतरी
सर्वत्र पेटलाय वणवा
होरपळतील बिचारी

करू नका म्हणावे त्यांना
चिंता इथल्या झाडांची
अजून तरी शिल्लक आहे
ओल इथल्या मातीची.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६२१
२६३४८
काव्य



## विपरीत

असे कसे विपरीत झाले ?
नुसता प्रकाशच गेला नाही
तर आकाशच नाहीसे झाले !
-आता पाखरांनी झेप घ्यावी कुणीकडे ?
आणि घरटी बांधायला उरलीही नाहीत झाडे.



# घर

सकाळी यावीत उन्हे
रात्री यावे चांदणे
-घरच बनते गाणे
अंगणात बाळ नाचरे
झाडावरती पाखरे
-घरच बनते हसरे
स्वागतशील उंबरा
तोरण असावे दारा
-घरच बनते देव्हारा.



# माझी आई

माझ्या आईला ठाऊक आहेत कष्ट
आणि दृष्ट काढणे मुलांची.
सिनेमाही तिने एकदाच - तोही रामाचा होता म्हणून पाहिला.
आणि पाहिला तेव्हा -
सिनेमातल्याच रामाला नमस्कार केला
नि म्हणाली -
''रामराया, तुमचा वनवास देऊ नका
माझ्या लेकराला.''

## परमेश्वरा

परमेश्वरा
तुझ्या आशीर्वादाने
माझं घर उध्वस्त झालं
पण माझ्या आशीर्वादाने
तुझं मंदिर सुखरूप राहिलं !



## कविता

या कविता, की आणखी काही ?
ते मला ठाऊक नाही.
कवितेशिवाय कवितेला
अन्य कुठली ओळख नाही.



## ते पाखरू

ते पाखरू कसे सारखे नाचते आहे
नुकतेच तर त्याला पंख फुटले आहेत,
आणि हे झाड किती शांत आहे !
या झाडावरच तर त्या पाखराचे घरटे आहे.



# जी. ए.

जी. ए.
तुमची लेखणी लेखणी नव्हती
ती होती एक छिन्नी
माणसाच्या मेंदूचा भुगा करणारी.
बरे झाले तुम्ही गेलात
नसता चुकून आम्ही तुम्हाला -
साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष केले असते
(आणि तसे झाले असते !)
तर शब्दांना शब्दकोशाशिवाय
गत्यंतर नव्हते !

## उसणे दु:ख

उसण्या दु:खाची
करू नये फेड
ओवण्याला धागा
असू द्यावे नेड !



## आडोसा

असो सावलीचा
असो की मातीचा
जगाया-मराया
हवाच आडोसा !



## भाकर

आपुल्या चुलीची
आपुली भाकर
असो करपली
तरी चवदार !

## वस्त्र

नेसल्या वस्त्राचे
नसते रे ओझे
ज्याचे त्याचे वस्त्र
ज्याला त्याला साजे !



# वाट

पाय आपलेच असले तरी
वाटा आपल्या नसतात,
आपण आपले चालत राहावे
वाट आपली करीत जावे !



## म्हणून काय ?

नेहमीच येतो
चंद्र आडोशाला
म्हणून काय झाडाने
विसरावे मातीला ?



*जमिनीवरचे पाणी*
*कुठे गेले. ? कुठे गेले ?*
*ज्याच्या त्याच्या डोळ्यात आहे!*

## मी धात्री, मी धरित्री

मी धात्री, मी धरित्री
मातृत्व माझा धर्म,
रुजवणं आणि वाढवणं एवढंच कळतं मला

आजवर कधी रडले नाही
कधी काही मागितले नाही
मागणं माझा स्वभावच नाही !
देणं माझं व्रत: आजवर देतच राहिले.
'तुमच्या 'एकाचे' हजार केले
मुठभराला ढिगभर दिले
तुडवले तरी रडले नाही
बडवले तरी कुढले नाही
झिजता झिजता हसत राहिले
दिसामासी फुलत गेले.
मला माहित होते -
मी फुलले तरच फुले फुलणार होती
मी हसले तरच पक्षी गाणार होते
पक्षी आकाशात झेपावले -
तरी झाडं माझी होती
गंध वाऱ्यासवे गेले -
तरी फुलं माझी होती
माझे नाते - ना चंद्राशी, ना सूर्याशी



ना वाऱ्याशी, ना ताऱ्याशी
माझे नाते - देठ तुटल्या फुलाशी !
वाऱ्याने झुलवले
ताऱ्याने चकवले
तरी मी चळले नाही, पाऊल कधी ढळले नाही
माझे रुजवणे थांबले नाही.
पण-
आकाशाने द्यावे तरच मी रुजवावे
आकाशानेच नाकारले पितृत्व तर मी काय करू ?
नाकारता येते पितृत्व
मातृत्व कसे नाकारू ?

बाळांनो,
मी वांझ नाही
वांझ असते तर -
या बेलगाम, विशाल आकाशाला अशी एका जागी
खिळवून ठेवू शकले नसते,
आता त्याचेच पौरुष संपले तर मी काय करू ?
(व्यभिचार करू ?)
धरित्रीनेच केला व्यभिचार तर -
पदराखाली झाकून ठेवावे असे काय उरणार ?
बैमान झाले आकाश म्हणून
एकदा बांधलेले इंद्रधनुष्याचे हे तोरण
मी तोडणार नाही,
कारण हातची दोरीच निसटली तर -
पाळणा पुन्हा हलणार नाही
पाळणा पुन्हा हलणार नाही !



# शहर-ए-औरंगाबाद

आठवणींचे हिरवे जरतारी वस्त्र पांघरलेली -
इतिहासाची जणू कबर: तसे हे शहर !
शहर दरवाजांचे !
असतात दरवाजे घराला, पण-
हे शहर असे नमुनेदार, की -
दरवाजेच शहराला !
[१] कुठे 'भडकल' कुठे 'दिल्ली' तर कुठे 'पैठण'
-
असतात सर्वत्र,
तशा आहेत इथेही गल्लया, पण -
साम्राज्य पुऱ्यांचे
(म्हणतात की हे शहर बावन्न पुऱ्यांचे !)
[२]'बेगम' पासून 'कोतवाल' पर्यंत
'उस्मान' पासून 'मोमिन' पर्यंत
'अमिन' 'गनिम' अधून मधून
'पदमपुरा' दुरून दुरून.
''एक सवारी 'औरंगपुरा'
है कोई 'चेलीपुरा'?''
- पाहूनच 'बिबीचा मकबरा'
ओळखून घ्यावा ताजमहालचा नखरा
[३]'सोनेरी महालात'ही उजळला होता
कधी काळी चंद्रगौर चेहरा !
- तशी नावापुरतीच उरली आहे आता 'पनचक्की'
पण इथल्या घोड्यांची नाल मात्र पक्की
(होते म्हणतात कधी काळी सज्ज इथे अश्वदल)
आता अश्वाचे बनलेत घोडे,
ओढतात टांगे
[४]''एक सवारी 'दिवाणदेवडी'
है कोई 'किराणाचावडी'?''



हात-पाय पोटाशी घेऊन पडावा एखादा
मस्त मौलाना फकीर, तसे हे शहर !
शहर चबुतऱ्यांनी वेढलेले
खंदकातील हिरव्या पाण्यात स्वतःचा -
- चेहरा न्याहाळीत बसलेले !

इथे मारुतीही सुपारीपुरता
५ आणि 'नागेश्वर', 'खडकेश्वर'
उगीचच आपले पेंशनेश्वर !
अजिंठ्याची चित्रलिपी वाचलीच नाही
- कधी या शहराने
ऐकलीही नाही कधी ती मृत्युंजयी हाक
वेरूळाच्या घृष्णेश्वराची !
जो येतो, तो धरतो रस्ता, थेट वेरूळ अजिंठ्याचा
६ 'हिम्‌रू मश्‌रूच्या' धाग्यात शोधीत बसतो -
जर जरतारी पैठणीचा !
अव्हेरले सौभाग्यलेणे या शहराने भरजरी पैठणीचे
ऐकले नाही कधी रडणे, नाथांनी कडेवर घेतलेल्या पोराचे
चटक चांदण्या नव्या इमारती हसतात पाहून आता या शहराला,
पंचतारांकित हॉटेल्स खिजवतात
डोळे मिचकावून 'सोनेरी महालाला'
म्हणाला मला चाँद टांगेवाला -
''साब,
वो औरंगाबाद तो हुआ कब का बरबाद
खंदक भी बन गया 'गंदा' नाला
अब आटा चक्की का
पानी तोटी का
दुवा अल्ला की
दवा 'घाटी' की''



- आणि त्याने लगावला चाबुक आपल्या
मरतुकड्या घोड्याला आणि ओरडला -
'' है कोई क्रांतीचौक[७]
है कोई क्रांतीचौक ?''

<u>संदर्भ</u>

१.भडकल, दिल्ली, पैठण ही दरवाज्यांची नावे.
२. बेगम, कोतवाल इ. ते चेलीपुरा ही वस्त्यांची नावे. चेलीपुरा ही वेश्यांची वस्ती.
३. 'सोनेरी महाल' राजघराण्यातील स्त्रियांचे राहण्याचे ठिकाण. औरंगजेबा़ची मुलगी इथे राहात होती अशी कथा सांगतात.
४. दिवाणदेवडी, किराणाचावडी ही वस्त्यांची नावे.
५. नागेश्वर, खडकेश्वर,महादेवाची मंदिरे - सध्या पेंशनरांचे फिरण्याचे ठिकाण.
६. खास औरंगाबादी वस्त्रविशेष. विशेषत: या धाग्याच्या शाली प्रसिद्ध आहेत.
७. एका चौकाचे नाव.



## निबिड अरण्य हे

निबिड अरण्य हे नगरानगरांचे
रस्त्याच्या नद्या दुथडी भरून वाहणाऱ्या
काठाकाठावर फेस गर्दीचा !
घराघरांची झाडे, झुडपे झोपडपट्ट्यांची
विजदिव्यांचे खांब : बने बांबूची
अधूनमधून पसरल्यात एअरकंडिशन्ड बंगल्यांच्या जाळ्या
त्यातूनच फोडतात काही वाघ, काही चित्ते नित्य डरकाळ्या !
घाबरतात त्यांना बिचाऱ्या फुटपाथवरील शेळ्या !
- हे पांढरेशुभ्र हत्ती, विधानभवनात मस्त झुलणारे
हे सुटाबुटातले लांडगे, मंत्रालयात फायली हुंगणारे
मिनिटामिनिटाला फुस्कारणाऱ्या लोकल्सच्या ह्या नागिणी
मारतात फटकारे लिप्स्टिक लावलेल्या पिवळ्याजर्द धामिणी !
- हे विद्यापीठांचे प्रचंड डोंगर
विद्वानांच्या दगडगोट्यांनी खचून भरलेले
ह्या प्रयोगशाळा, ह्या अणुभट्ट्या -
इथे माणसांचे मेंदू सडत पडलेले
- प्रत्येक ऑफिस म्हणजे गुहा एकेका सिंहाची
प्रत्येक खुर्ची म्हणजे जागा एकेका गेंड्याची
या अरण्यात सूर्यालाही 'ट्रेसपास' अलाउड नाही
'विदाउट परमिशन' चंद्रालाही आत येता येत नाही
याच अरण्यात वाट चुकलेला मीही कुणीतरी एक
म्हणतो आहे की -
अवघी पृथ्वीच नांगरून
घेईन नवे पीक !



# स्वामी

स्वामी,
आम्ही सगळे दगडधोंडे पुजले
घासून घासून नाकही सुजले
पण देवाचा वासही आला नाही !
घालून घालून दंडवत
आम्हीच आता प्रेतवत झालोत
खूप फोडला टाहो
पण त्याला कंठ फुटला नाही !
मांडला आकांत, केला अक्रोश,
गेलो घाटाघाटांवर, हिंडलो नद्यांच्या काठाकाठाने
पण तीर्थप्रसादावाचून काहीही मिळाले नाही !
स्वामी,
पळीभर तीर्थाने तहान भागावी कशी ?
चिमुटभर प्रसादाने भूक भागावी कशी ?
चिडून चिडून मस्तक आदळले...
रक्त गाळले
आमच्या रक्ताच्या शेंदुराने तरी दगडाचा देव व्हावा
पण तसेही झाले नाही !
शेंदरापेक्षा रक्त पातळ असते
हे कधी कळलेच नाही !



## काय झाले ?

झाडे तर हिरवी आहेत
पानझड झाली म्हणून काय झाले ?
आभाळ तर निळे आहे
ढग आले म्हणून काय झाले ?
जमिन तर ओलीच आहे
मोसम सरले म्हणून काय झाले ?
पाय तर भक्कम आहेत
वाटा मिटल्या म्हणून काय झाले ?
गळा तर शाबूत आहे
गाणे विरले म्हणून काय झाले ?



## माझे आकाश

पाहता पाहता आताच कसे
असे एकदम अंधारून आले,
आकाशातील चंद्र, सूर्य -
आणि तारे कुठे गेले ?
वर,खाली बघतो आता
आकाश कोठे दिसत नाही
डोळ्यात पाणी एवढ्याचसाठी
माझे आकाश उरले नाही !



## चौकोनी आकाश

पेलवत नाही आकाश म्हणून
डोक्यावर छप्पर ठेवून वावरणारे आम्ही
सोयीपुरताच यावा वारा म्हणून -
घराला खिडक्याही ठेवणारे आम्ही
लखलखत्या प्रकाशाला बंद करण्यात आम्ही पटाईत
कोणत्याही दगडाला शेंदूर लावून देव करण्यात सराईत
आम्ही किती खुष असतो खिडकीतून दिसणाऱ्या
आकाशाच्या चौकोनी तुकड्यावर
आणि तुकड्या तुकड्यांनीच जोडलेल्या
आम्हीच आमच्या आयुष्यावर !



## निरोप १

आज मी तुझा निरोप घेतोय
म्हणू नकोस 'पुन्हा कधी येशील ?'
विचारू नकोस असला प्रश्न
ज्याचे उत्तर तुला ठाऊक आहे
ठाऊक आहे तुला बोलावे कसे,
लपवून मनातले पिसे.
राणी,
निरोप घेणे भलत्यासलत्याला जमत नसते !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



## निरोप २

मी जातोय, तुझा निरोप घेतोय
हलवू नकोस हात, उघडू नकोस ओठ.
करू नकोस केविलवाणी फडफड पापण्यांची
तुझ्या पापण्या पापण्या नाहीत
ते आहेत पंख
झेपावल्या पाखराचे
पापण्यांनी -
रडायचे असते
पंखांनी -
उडायचे असते !



## ही रात्र

ही रात्र नसती,
नसता या रात्रीला चांदण्याचा पदर
तर वारा नसता आला घरोघर
म्हणून तर घरोघरी जपतात रात्रीला
रात्रीच्या चांदण्याला
चांदण्यातील वाऱ्याला
वाऱ्यातील स्वप्नाला
स्वप्नातील आपल्याला !



## औरसांनो

आईचे दूध प्यावे
तसा प्यालो नुसतेच पाणी
माझ्यासाठी नव्हतीच कधी
चिऊकाऊची निर्मळ गाणी !
अंगाईवाचून नीज येई
मग गाणार कोण ओव्या ?
पाचवीलाच पुजल्या होत्या
माझ्यासाठी राखीव शिव्या !
बिस्मिल्लाची गोड सनई
नाहीच घुमली कधी कानात
उघड्यावरच नेहमी होई
सदैव माझी मंगलप्रभात !
जन्म माझा : एक अपघात
मी असा लेकावळा,
औरसांनो, मग कुणासाठी ?
तुमचा हा अनौरस उमाळा ?



# ती

हातात कुंकवाचा करंडा असो
की असो डोक्यावर पाटी
मी पाहतो तिच्या डोळ्यात -
चंद्र-सूर्याच्या गाठी-भेटी !
तिच्या हातात असो झाडू
की असो गंगेचा गडू
मी पाहतो केवळ काळीज
पाखरासारखे उडू उडू !
ती असो सदाशिवपेठी
की असो गावठी
केवळ पाढा संसाराचा
मी वाचतो तिच्या ललाटी !
- आणि हेही खरे की
फुलांची करंडी हातात म्हणून
तिचे कुरूपपण झाकत नाही
आणि डोक्यावर कचऱ्याची पाटी म्हणून
तिचे लावण्य लोपत नाही !



## भाग्य

तू पंख झेपावत आलीस
पण मी आकाश नव्हतो
पाखरांनी यावे
हे भाग्य आकाशाचे !

## दार

दार तर बहुतेक बंद करण्यासाठी;
येणारा काय, केव्हाही, कसाही येऊन जातो
जाणारा पुन्हा येऊ नये किंवा हवा तेव्हाच यावा
यासाठी तर सोय दाराची
कुणीही यावे-जावे
वाट देणे काम दाराचे.



## भाग्य

तू पंख झेपावत आलीस
पण मी आकाश नव्हतो
पाखरांनी यावे
हे भाग्य आकाशाचे !

# दार

दार तर बहुतेक बंद करण्यासाठी;
येणारा काय, केव्हाही, कसाही येऊन जातो
जाणारा पुन्हा येऊ नये किंवा हवा तेव्हाच यावा
यासाठी तर सोय दाराची
कुणीही यावे-जावे
वाट देणे काम दाराचे.



## तहान

तहानलेले पक्षी माझ्या डोळ्यांचे
काठावर येऊन बसतात
डोळ्यातील थेंबानीच
आपली तहान भागवतात.

# ?

कशी दिसू लागलीत ही सगळीच पाखरे
एकदम अशी बापुडवाणी,
संपली तर नाहीत ना -
त्यांच्या उरातील सगळीच गाणी ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0026347
REFBK-0026347



## कवितेची सांगता

एखादा समारंभ संपावा,
उरावा पाठीमागे रिकामा मंडप...
दिव्यांच्या विझलेल्या माळा...
चुरगळलेली बिछायत...
रिकामे व्यासपीठ... सुकलेले हार...
फेकलेले गुच्छ... मुके झालेले माइक्स.
आणि उरलेली केवळ बोलकी शांतता
‘........................’
हीच असते कविता
उत्सवाची सांगता म्हणजेच कविता.

